Call 91 22 42130000 Visit www.pritishnandycom.com Email investorgrievatce@pritishnandycom.com

RELIANCE

Communications

# Notice to the Members

Notice is hereby given that the 12th Annual General Meeting (AGM) of the Members of Reliance Communications Limited (the "Company") is scheduled to be held on Tuesday, September 27, 2016 at 12.00 noon or soon after the conclusion of the AGM of Reliance Capital Limited convened on the same date, whichever is later, at Birla Matushri Sabhagar, 19, New Marine Lines, Mumbai 400 020, to transact the items of business as set out in the notice.

The abridged Annual Report containing, inter alia, the Notice convening the AGM setting out the business to be transacted thereat, abridged Balance Sheet as at March 31, 2016, abridged Statement of Profit and Loss and Cash Flow Statement for the financial year ended on that date, the Independent Auditors' Report thereon and the report of the Board of Directors along with Consolidated Financial Statement and remote e-voting form is being despatched to the Members of the Company.

The items of business set out in the Notice of AGM may be transacted through voting by remote e-voting as well as by voting at the venue of the Meeting. The Annual Report and remote e-voting form is also being sent electronically to those members, who have registered their e-mail addresses. Members who have not registered their e-mail addresses so far are requested to do so, in respect of their electronic holdings with the Depository through their concerned Depository Participant. Members who hold shares in physical form are requested to register their e-mail addresses with Karvy Computershare Private Limited ("Karvy"), Registrar and Transfer Agent of the Company.

**A member entitled to attend and vote at the AGM is entitled to appoint a Proxy to attend and vote on poll instead of herself / himself and the Proxy need not be a member of the Company. The instrument appointing Proxy to be valid should, however, be deposited at the Registered Office of the Company not later than 48 hours before the commencement of the AGM.**

Pursuant to the provisions of Section 108 of the Companies Act, 2013 (the "Act") read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, as amended from time to time and Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Company is offering remote e-voting facility to its members. A person whose name is recorded in the Register of Members or in the Register of Beneficial Owners maintained by the depositories as on September 20, 2016 (Cut-off date) only shall be entitled to avail the facility of remote e-voting as well as voting at the venue of the AGM.

Any person, who becomes a member of the Company after the date of despatch of the Annual Report and holds shares as on the Cut-off date can send a requisition quoting his Regd. Folio No. / DP Id. / Client Id. to the Registrar and Transfer Agent - Karvy Computershare Private Limited, for obtaining copy of the Notice, Annual Report and e-voting form.

The remote e-voting shall commence on September 24, 2016 (10:00 A.M. IST) and end on September 26, 2016 (5:00 P.M. IST), after which remote e-voting shall not be allowed. The remote e-voting module shall be disabled by Karvy for voting thereafter. Once the vote on a resolution/s is/ are cast by the Member through remote e-voting, she / he shall not be allowed to change it subsequently. Remote e-voting is optional. Details of the manner of casting of votes are available in the Notice of the AGM, displayed on the website of the Company viz. www.rcom.co.in and on the website of the remote e-voting agency viz. https://evoting.karvy.com.

Facility for voting shall also be made available to those members who attend the AGM and who have not already cast their vote by remote e-voting. A member may participate at the AGM even after exercising her / his right to vote through remote e-voting but shall not be allowed to vote again at the meeting.

The Board of Directors have appointed Shri Anil Lohia or in his absence, Shri Rinkit Kiran Uchat, Partners, M/s. Dayal & Lohia, Chartered Accountants as the scrutinizer to scrutinize the voting process.

The result of the voting will be declared and communicated to BSE Limited and National Stock Exchange of India Limited within forty eight hours from the conclusion of the AGM and the same along with the Scrutinizers Report will be uploaded on the website of the Company (www.rcom.co.in) and website of the Karvy Computershare Private Limited.

The abridged and full annual report containing, inter alia, the full sets of financial statements and reports are also available on request in writing by any person, who is otherwise entitled to receive such documents under Section 136 of the Act. For this purpose, the member may write to the Company at its Registered Office address or Registrar and Transfer Agent - Karvy Computershare Private Limited (Unit: Reliance Communications Limited), Karvy Selenium, Tower – B, Plot No. 31 & 32, Survey No.116/22, 115/24, 115/25, Financial District, Nanakramguda, Hyderabad 500 032. The full annual report may also be accessed from the Company's website : www.rcom.co.in.

Notice is also hereby given that pursuant to Section 91 of the Act, Rule 10 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 and Regulation 42 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 the Register of Members and Share Transfer Books for equity shares of the Company shall be closed from Saturday, September 17, 2016 to Tuesday, September 27, 2016 (both days inclusive) for the purpose of AGM.

Queries / grievances with regard to remote e-voting may be addressed to the Company Secretary at the Registered Office address of the Company or through e-mail at : Rcom.Investors@relianceada.com.

For Reliance Communications Limited

Prakash Shenoy
Company Secretary

Place : Mumbai
Date : August 30, 2016

**Reliance Communications Limited**
Registered Office: H Block, 1st Floor, Dhirubhai Ambani Knowledge City,
Navi Mumbai – 400 710
Tel: +91 22 303 86286, Fax: +91 22 303 76622
Website: www.rcom.co.in, E-mail: Rcom.Investors@relianceada.com

RELIANCE
Communications

## सभासदांना सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडच्या (''कंपनी'') सभासदांची १२वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक २७ सप्टेंबर २०१६ रोजी मध्यान्हीचे १२ वाजता किंवा त्याच दिवशी बोलावण्यात आलेल्या रिलायन्स कॅपिटल लिमिटेडची वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यानंतर लगेचच, यापैकी जे उशिरा घडेल त्यावेळी, बिर्ला मातोश्री सभागृह, १९, न्यू मरिन लाईन्स, मुंबई ४०० ०२० येथे, सूचनेत उल्लेख केलेले कामकाज पार पाडण्यासाठी आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

अन्य बाबींबरोबरच वार्षिक सर्वसाधारण सभेत पार पाडावयाच्या कामकाजाबद्दल माहिती देणारी सूचना, ३१ मार्च २०१६ रोजीनुसारचा संक्षिप्त ताळेबंद, त्याच तारखेला संपलेल्या आर्थिक वर्षासाठीचे संक्षिप्त नफा–तोटा पत्रक आणि रोकड प्रवाह विवरण, त्यावरील स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल आणि एकत्रित वित्तीय विवरणासहित संचालक मंडळाचा अहवाल आणि रिमोट ई–व्होटिंग प्रपत्र यांच्या सहित संक्षिप्त वार्षिक आहवाल कंपनीच्या सभासदांना पाठविण्यात येत आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत उल्लेख केलेले कामकाज रिमोट ई–व्होटिंगच्या माध्यमातून तसेच सभेच्या ठिकाणी करावयाच्या मतदानाच्या माध्यमातून पार पाडले जाऊ शकेल. ज्या सभासदांनी त्यांचे ई–मेल पत्ते नोंदविलेले आहेत, त्यांना वार्षिक अहवाल आणि रिमोट ई–व्होटिंग प्रपत्रेही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठविण्यात येत आहे. ज्या सभासदांनी त्यांचे ई–मेल पत्ते अजूनही नोंदविलेले नाहीत, त्यांनी त्यांच्या इलेक्ट्रॉनिक होल्डिंगच्या बाबतीत ते त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटच्या माध्यमातून डिपॉझिटरीकडे नोंदवावेत अशी विनंती करण्यात येत आहे. ज्या सभासदांनी प्रत्यक्ष रूपात भाग धारण केलेले असतील, त्यांनी त्यांचे ई–मेल पत्ते कारवी कॉम्प्युशेअर प्रायव्हेट लिमिटेड (''कारवी''), कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण अभिकर्ता यांच्याकडे नोंदवावेत अशी विनंती त्यांना करण्यात येत आहे.

**वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहून मतदान करण्यास पात्र असलेल्या सभासदांना त्यांच्या स्वत:ऐवजी सभेस उपस्थित राहून मतदान करण्यासाठी प्रतिनिधी नियुक्त करण्याचा हक्क असेल आणि असा प्रतिनिधी कंपनीचा सभासद असण्याची आवश्यकता नाही. परंतु प्रतिनिधी नियुक्तीचा दस्तऐवज वैध असण्यासाठी तो कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान ४८ तास आधी जमा केला गेला पाहिजे.**

कंपनी कायदा, २०१३ (''कायदा'') च्या कलम १०८च्या अनुषंगाने व त्यासोबत वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या सहवाचनांतर्गत आणि सेक्युरिटिज् अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ मधील विनियम ४४ अंतर्गत कंपनी आपल्या सभासदांना ई–व्होटिंगची सुविधा उपलब्ध करून देत आहे. सभासदांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरिज्नी ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत ज्या व्यक्तीचे नाव २० सप्टेंबर २०१६ रोजी (कट–ऑफ डेट) नोंदविलेले असेल, फक्त तीच व्यक्ती रिमोट ई–व्होटिंगची तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी मतदान करण्याची सुविधा प्राप्त करू शकेल.

वार्षिक अहवाल पाठवून झाल्याच्या तारखेनंतर जर कोणतीही व्यक्ती कंपनीची सभासद होऊन अंतिम तारखेस (कट–ऑफ डेट) भाग धारण करीत असेल, तर ती तिचा नोंदणीकृत फोलिओ क्र./डीपी आयडी/क्लाएंट आयडीचा उल्लेख करून, या सूचनेची प्रत, वार्षिक अहवाल आणि ई–व्होटिंग प्रपत्र प्राप्त करण्यासाठीची तिची मागणी निबंधक आणि हस्तांतरण अभिकर्ता – कारवी कॉम्प्युशेअर प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे पाठवू शकेल.

रिमोट ई–व्होटिंग २४ सप्टेंबर २०१६ रोजी (सकाळी १०.०० वाजता भाप्रवे) सुरू होऊन २६ सप्टेंबर २०१६ रोजी (सायंकाळी ५.०० वाजता भाप्रवे) संपेल, ज्यातंनर रिमोट ई–व्होटिंगसाठी परवानगी देण्यात येणार नाही. त्यानंतर रिमोट ई–व्होटिंग मॉड्यूल कारवीकडून मतदानाच्या दृष्टीने निष्क्रिय करण्यात येईल. कोणत्याही ठरावा/वांवर सभासदाने रिमोट ई–व्होटिंगच्या माध्यमातून मत दिले की त्यानंतर ते त्याला/तिला बदलता येणार नाही. रिमोट ई–व्होटिंग ऐच्छिक आहे. मतदान करण्याच्या पद्धतीविषयीचे तपशील कंपनीच्या www.rcom.co.in ह्या संकेतस्थळावर आणि रिमोट ई–व्होटिंग अभिकरणाच्या https://evoting.karvy.com ह्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत उपलब्ध आहेत.

मतदान करण्याची सुविधा, जे सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असून ज्यांनी आधीच त्यांचे मत रिमोट ई–व्होटिंगच्या माध्यमातून दिलेले नसेल, त्यांना उपलब्ध असेल. रिमोट ई–व्होटिंगच्या माध्यमातून मतदानाचा हक्क बजावल्यानंतरही सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होऊ शकेल, पण त्याला/तिला या सभेत पुन्हा मतदान करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

संचालक मंडळाने श्री. अनिल लोहिया किंवा त्यांच्या अनुपस्थितीत श्री. रिंकित किरण उचाट, भागीदार, मेसर्स दयाल अँड लोहिया चार्टर्ड अकाऊंटंटस् ह्यांची मतदानाच्या प्रक्रियेची छाननी करण्यासाठी छाननीकार म्हणून नियुक्ती केलेली आहे.

मतदानाचे निकाल जाहीर करून ते वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यानंतर अठ्ठेचाळीस तासांच्या आत बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ह्यांना कळविण्यात येतील आणि ते छाननीकारांच्या अहवालासहित कंपनीच्या संकेतस्थळावर (www.rcom.co.in) आणि कारवी कॉम्प्युशेअर प्रायव्हेट लिमिटेड ह्यांच्या संकेतस्थळावर अपलोड केले जातील.

अन्य बाबींबरोबरच वित्तीय विवरणे आणि अहवाल यांचे संपूर्ण संच असलेला संक्षिप्त आणि संपूर्ण वार्षिक अहवाल, या कायद्याच्या कलम १३६ अनुसार प्राप्त करण्यास अन्यथा पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्यासाठी लेखी विनंती केल्यासही उपलब्ध असेल. यासाठी सभासद कंपनीला तिच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर किंवा निबंधक आणि हस्तांतरण अभिकर्ता – कारवी कॉम्प्युशेअर प्रायव्हेट लिमिटेड (युनिट: रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड), कारवी सेलेनिअम, टॉवर–बी, भूखंड क्र. ३१ आणि ३२, सर्वेक्षण क्र. ११६/२२, ११५/२४, ११५/२५, फायनान्शिअल डिस्ट्रिक्ट नानकरामगुडा, हैद्राबाद ५०० ०३२ ह्यांच्याकडेही लिहून कळवू शकतील. संपूर्ण वार्षिक अहवाल कंपनीच्या www.rcom.co.in. ह्या संकेतस्थळावरही पाहिला जाऊ शकतो.

ह्या कायद्याच्या कलम ९१ अंतर्गत कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम १०च्या अंतर्गत आणि नियम ४२ सेक्युरिटिज् अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ याद्वारे अशीही सूचना देण्यात येते की, कंपनीची सभासद नोंदवही आणि समभाग हस्तांतरण पुस्तिका वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अनुषंगाने आणि ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी भागधारकांची लाभांशासाठीची पात्रता निश्चित करण्याकरिता शनिवार दिनांक १७ सप्टेंबर २०१६ ते मंगळवार दिनांक २७ सप्टेंबर २०१६ (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद राहतील.

रिमोट ई–व्होटिंगच्या बाबतीतील शंका/तक्रारी कंपनी सचिवांकडे, कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाकडे पाठवून किंवा rcom.investors@relianceada.com या ई–मेलवर पाठवून कळविता येतील.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ३० ऑगस्ट २०१६

रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडकरिता
प्रकाश शेणॉय
कंपनी सेक्रेटरी

**रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड,**
नोंदणीकृत कार्यालय: एच ब्लॉक, १ला मजला, धीरूभाई अंबानी नॉलेज सिटी, नवी मुंबई – ४०० ७१०.
दूरध्वनी : +९१ २२ ३०३ ८६२८६, फॅक्स : +९१ २२ ३०३ ७६६२२
संकेतस्थळ: www.rcom.co.in, ई–मेल: rcom.investors@relianceada.com
सीआयएन : एल४५३०९ एमएच२००४पीएलसी१४७५३१